**आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम:-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हयांच्या गरजांवर आधारित लोकोपयोगी लहान स्वरुपाची कामे घेण्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी विशेष तरतूद सन १९८३-८४ पासून करण्यात येत होती. सन १९८८-८९ पासून ही तरतूद विधानसभा मतदारसंघनिहाय करण्यात आली. सदर विशेष तरतूद सन १९९४-९५ पर्यंत नियमित योजना नियतव्ययाच्या व्यतिरिक्त होती. सन १९९४-९५ या आर्थिक वर्षामध्ये प्रथमच विधानपरिषद सदस्यांसाठीही तरतूद करण्यात आली. सन १९९५-९६ पासून हा कार्यक्रम जिल्हा नियोजन समित्यांच्या अखत्यारीत आणला होता व त्यासाठीची तरतूद जिल्हा योजनेसाठी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात आली. तथापि, सन १९९९-२००० पासून या योजनेचा समावेश राज्यस्तर योजना म्हणून करण्यात आला. तसेच सन २००४-०५ या वर्षापासून आदिवासी मतदारसंघासाठीच्या निधीची तरतूद बिगर आदिवासी योजनेतून करण्यात येत असून सामाजिक दृष्टया मागासलेल्या घटकांसाठी १०% निधी राखून ठेवण्याची तरतूद या कार्यक्रमांतर्गत करण्यात येते. सन २००६-०७ या वर्षापासून सर्व विधानपरिषद सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील (कार्यक्षेत्र नसल्यास राज्यातील) कोणताही एक जिल्हा नोडल जिल्हा म्हणून घोषित करणे आवश्यक करण्यात आले आहे. विधानपरिषद सदस्यांना आर्थिक वर्षाकरिता अनुज्ञेय असलेला संपूर्ण निधी शासन स्तरावरून या नोडल जिल्हयास सुपूर्द केला जातो व तद्नंतर विधानपरिषद सदस्यांच्या शिफारशीनुसार या निधीचे पुढील वितरण त्या नोडल जिल्हयामार्फत केले जाते. विधानपरिषद सदस्याला त्यांच्या आर्थिक वर्षातील कार्यकालानुसार त्याप्रमाणात निधी अनुज्ञेय आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून सर्व विधानमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या निधीमध्ये वाढ करण्यात येऊन, सदरचा निधी प्रती आर्थिक वर्षी प्रति विधानमंडळ सदस्य रु. २००.०० लक्ष करण्यात आला होता. तथापि, सदर निधीमध्ये वाढ करुन सन २०२०-२१ या वर्षामध्ये प्रति विधीमंडळ सदस्य रु. ३००.०० लक्ष व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून प्रति विधीमंडळ सदस्य रु. ४००.०० लक्ष याप्रमाणे निधी अनुज्ञेय करण्यात आला आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सर्वसमावेशक मागदर्शक सूचना शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का. १४८२, दि. १२ जुलै, २०१६ अन्वये निश्चित करण्यात आल्या असून यामध्ये काळानुरुप बदल करण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय / शासन परिपत्रके शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

----------------

## खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना :-

"खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मा. संसद सदस्यांना त्यांच्या मतदार संघातील विकास कामे करण्यासाठी केंद्र शासनाकडून सन १९९३-९४ मध्ये प्रत्येकी रु. ५.०० लक्ष व १९९४-९५ ते १९९७-९८ पर्यंत रुपये १.०० कोटी या प्रमाणात निधी दिला जात होता. तसेच सन १९९८-९९ पासून सन २०१०-११ या आर्थिक वर्षापर्यंत रु. २.०० कोटी इतका निधी दिला जात होता. सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून संसद सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या निधीमध्ये वाढ करण्यात येऊन प्रत्येक संसद सदस्यांस प्रति आर्थिक वर्षाकरीता रु. ५.०० कोटी इतका निधी देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन ही योजना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राबविली जाते. या योजनेंतर्गत संसद सदस्यांना अनुज्ञेय असलेला निधी केंद्र शासन ECS द्वारे परस्पर सबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात येतो. जिल्हाधिकारी हा निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडून त्यामध्ये ठेवतात. या कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण केंद्र शासनाच्या स्तरावर सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत करण्यात येत असून जून, २०१६ पासून या कार्यक्रमाची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली आहेत. राज्य स्तरावर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी राज्य नोडल विभाग म्हणून नियोजन विभागाची आहे.

---------------